International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March -2022, Impact Factor: 7.429, Available online at: www.ijaresm.com

# यशवंतराव चव्हाण: संघर्षातून उदयास आलेले नेतृत्व

प्रा. डॉ. जाधवर बी. डी.

बलभीम महाविद्यालय बीड इतिहास विभाग प्रमुख

-------------------------------------------*****************-------------------------------------------

## प्रस्तावना

भूपृष्ठावर ज्या मानवाने जन्म घेतला आहे त्या माणसाला किंवा व्यक्तीला समोर असलेल्या परिस्थितीवर विजय मिळवता येत नाही तो तिचा गुलाम बनतो हे समाज मान्य आहे पण तो प्रयत्न न करता आपले भाग्य नशिब या गोष्टीला दोष देण्याचा प्रयत्न करतो काही कर्तुत्ववान व्यक्तींनी असे म्हटले आहे की जीवन जगत असताना माणूस कधी कधी घोड्यावर स्वार होतो पण तो घोड्यावरून खाली पडल्यानंतर जर त्याला उठता आले नाही तर तो स्वतःचे संरक्षण करण्यात यशस्वी पण तो एकंदर जीवनाच्या अनेक पायऱ्या आहेत त्यामध्ये आपणास अनेक वेळेला अपयश येते पण अपयशाने खचून जाऊन धिर सोडून जाणे योग्य नाही आपणास अपयश आले तर त्याची कारणे शोधून शोधलेल्या कारणावर हिमतीने मात करण्याचा प्रयत्न केला तर आपले ध्येय साध्य करण्याच्या कार्यात कोणतेच अडथळे निर्माण होणार नाहीत. याशिवाय ज्ञानसंपादन आणि आपली यशाची जिद्द आपण कायम टिकून ठेवली तर अपयशा मधून सुद्धा आपण कार्य प्रवण बनु शकते हे आपल्या लक्षात येईल. वरील सर्व नमूद केलेल्या शब्दाचे आपण सूक्ष्मपणे निरीक्षण केल्यानंतर असे स्पष्ट होते की यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य काय होते ते एका गरिबी आणि अगदी सामान्य कुटुंबामध्ये जन्म घेतलेले यशवंतराव वाढत्या वयातच देशभक्तीने प्रेरित होऊन अगदी अल्प वयातच अठरा महिन्यांचा येरवडा तुरुंगात कारावास भोगतात आणि सर्व परिस्थितीवर मात करून वकिलीची सनद प्राप्त करतात आणि तरीपण स्वातंत्र्याचे लढ्यात सक्रिय सहभाग नोंदवतात यावरून त्यांच्या आत्मविश्वासाची आपण जाणीव होते. त्यांनी प्रारंभी च्या काळात देश समर्पित असे कार्य केले त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांच्या राजकीय सातत्यामुळे वयाच्या फक्त 42 व्या वर्षी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होण्याचे मान मिळवला पुढे 1 मे 1960 मध्ये नव

महाराष्ट्र राज्य उदयास आले त्या राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांनी केलेली कामगिरी अतिशय अविस्मरणीय अशी आहे त्यांच्या कार्याचा आलेख सातत्याने वाढत राहिला मुख्यमंत्री, नंतर संरक्षण मंत्री, आणि गृहमंत्री अशा विविध खात्यांच्या जबाबदाऱ्या यशवंतराव चव्हाण यांनी अतिशय खंबीरपणे निभावल्या त्यामुळे ते नाव लौकिक झाले असे म्हटले जाते वरील कार्यकुशल नेत्याच्या नेतृत्वाचा विविध पैलूंच्या आधारे अभ्यास करणे येथे गरजेचे आहे ते आपण खालील प्रमाणे पाहणार आहोत.

**यशवंतरावांनी संरक्षण खात्यास दिलेली प्रतिष्ठा :-**

15 ऑगस्ट 1947 रोजी देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले होते हे आपणास ज्ञान आहे परंतु देशापुढे स्वातंत्र्यानंतर अनेक आव्हाने उभी होती त्या आव्हानावर मात करण्यासाठी असणारी कल्पक विचारशक्ती ही यशवंतराव चव्हाण यांच्याकडे होती, त्यामुळे पक्ष श्रेष्टीने त्यांची देशाचे संरक्षण मंत्री म्हणून निवड केली या काळात महत्त्वाचा प्रश्न होता तो म्हणजे राज्य पुनर्रचना करणे, या गोष्टीचा परिणाम असा झाला की वरील गोष्टीमुळे महाराष्ट्रातील चळवळीचा जोर कमी झाला नाही उलट वेगवेगळ्या मत मततांरानी विरोध निर्माण झाला. तेव्हा यशवंतरावांच्या योगदान महत्वाचे राहिले ते मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांनी आपले लक्ष

प्रामुख्याने शेतीकडे केंद्रित केले होते. त्यामुळे त्यांनी असे म्हटले होते की देशातील आणि महाराष्ट्रातील जनतेची आर्थिक भरभराटी ही शेतीवर अवलंबून आहे कारण आपले औद्योगीकरण सुद्धा आपल्या शेतीच्या भरोशावर अवलंबून आहे त्यामुळे देशाच्या आर्थिक यंत्रणेत शेतीला मध्यवर्ती स्थान देणे गरजेचे आहे. यामुळे बहुजनांची मुलं शिकली पाहिजे त्यांनी शिक्षण घेऊन नवतंत्र व विज्ञान यांच्या सहाय्याने शेती उत्पादनात वाढ केली पाहिजे. यामधून सामाजिक भेदाभेद दुर होऊन नव समाज निर्मितीच्या कार्यात समतेचे महत्व प्राप्त होईल हे त्यांनी स्पष्ट केले होते.

एकंदर यशवंतरावांनी एक यशस्वी मुख्यमंत्री म्हणून केलेले कार्य त्यांचे प्रशासनातील कौशल्य याशिवाय उदारमतवाद या सर्व गोष्टींची दखल तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी घेतली त्यास शास्त्रीजीनी संमती दिली, यामुळे महाराष्ट्र भूमीत जन्माला आलेला यशवंत 22 नोव्हेंबर 1962 रोजी देशाचे संरक्षण मंत्री म्हणून पदभार घेतात तत्कालीन संरक्षण मंत्री कृष्णा मेनन यांच्यावर झालेले वेगवेगळे आरोप आणि विविध घटनेमुळे दिल्लीतील वातावरण गरम झाले होते. अनेक सदस्यांच्या विरोधामुळे कृष्णा मेनन यांचा राजीनामा घेणे भाग पडले होते. याच काळात भारत चीन युद्धात हिंदी चीनी भाई -भाई या नेहरूच्या धोरणाचा पराभव झाला होता या वातावरणात संरक्षण मंत्रीपद सांभाळणे ही अतिशय कठीण कामगिरी यशवंतराव चव्हाण यांच्यावर आलेली होती वरील पदासाठी अनेक व्यक्ती दावेदार होत्या परंतु या सर्वांना यशवंतरावच नेहरुंच्या विश्वास पात्र ठरले. कारण 1956 ते 1962 अशी सहा वर्षाची यशस्वी मुख्यमंत्र्यांची कारकीर्द त्यांच्या पाठीशी उभी होती एक कुशल प्रशासक आणि सर्व विश्वासाला पात्र अशी त्यांची ख्याती होती. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रात काँग्रेसला मोठे यश प्राप्त झाले होते या सर्व गोष्टींची साक्ष म्हणून संरक्षण मंत्री हे फार मोठे सन्मानाचे पद त्यांना बहाल करण्यात आले होते.

**कुशल नेतृत्वाचे कार्य :-**

चीनने भारतावर आक्रमण केले त्या पार्श्वभूमीवर संरक्षण मंत्री या नात्याने यशवंतराव असे म्हणतात की हमे हिम्मत नही रहना चाहिये, अगर चीन चीन है तो हम प्राचीन है, यामधून असे स्पष्ट होते की परिस्थिती ही अनुकूल नसतानाही यशवंतरावांनी सर्व भारतीय समाज आणि सैनिकांच्या आशा पल्लवीत केल्या होत्या 1962 मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले त्याचा बिमोड करण्यासाठी पाठवलेल्या भारतीय सैन्याचा चीन ने पराभव केला. एकंदर भारतीय सैन्याची वाताहात झाली यामुळे भारतीय सैन्याच्या प्रतिष्ठेवर व शौर्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. याच काळात यशवंतराव महाराष्ट्रातून दिल्लीला आले होते. त्यांनी संरक्षण मंत्री पदाची जबाबदारी घेताच चीनने एकतंत्रि युद्धबंधी ची घोषणा केली. त्या संदर्भात विविध कारणे पुढे आलेली होती त्यापैकी डिसेंबर ते जानेवारी या काळात युद्धभूमीवर फार थंडी असे त्यामुळे सैन्य संरक्षणासाठी चीनने माघार घेतली होती. पण यशवंतरावांनी विचार केला आज चीन थांबला आहे उद्या थंडी संपली की चीन आक्रमण करणार आहेच त्यामुळे त्यांनी अनेक समस्या बाजुस ठेवून सेनादलाच्या युद्धपातळीवर त्यांनी लक्ष केंद्रित केले होते आणि भविष्यतील आक्रमण गृहीत धरून त्यांची नियोजनबद्ध कार्य हाती घेतले हे त्यांच्या कौशल्याचे एक उदाहरण होय.

**सैनिकांचे मनोबल वाढवून पाकिस्तानवर केलेली मात :-**

यशवंतराव चव्हाण यांच्या संदर्भात अनेक विचारवंत, लेखक, आणि तत्वते, राजकारणी यांनी एक मुत्सदी प्रशासक अशी उपाधी त्यांनी दिलेली आहे. त्यांच्या पाठीशी अनेक क्षेत्रात काम केल्याचा अनुभव ही होता त्या अनुभवाचा माध्यमातून त्यांनी सैन्यदलाची मजबुती करणे आवश्यक आहे हे त्यांनी निश्चित केले चिनीसैनिकका कडून झालेल्या पराभवाने भारतीय सैनिकांचे खचलेले मनोबल वाढवण्यासाठी यशवंतरावांनी अगदी खालच्या किंवा छोट्या पदावर असणाऱ्या सैनिकी अधिकाऱ्यांच्या सातत्याने भेटी घेणे सुरू केले. ज्याच्यावर आवश्यकता आहेत त्या पूर्ण करणे आणि त्यांनी सैनिकांना विश्वास दिला. की त्यांनी दिलेल्या सूचनांचा सन्मान केला जाईल. सैन्यदलातील प्रमुखांना भेटणे. प्रशिक्षण वर्गाला जाणे. त्यांच्याशी संवाद करणे प्रसंगी भोजन करणे यामुळे त्यांच्या कार्याचा प्रत्यक्ष अनुभव यशवंतराव घेत होते. याशिवाय

तिन्ही दलाच्या प्रमुखाने दररोज सकाळी प्रमुखांची भेट घेत असत त्या भेटी प्रात: कालीन प्रार्थना असे म्हटले जात असे यामधून सैनिकांच्या अनेक समस्यांचे निराकरण होत असे. त्यांनी सैनिकांची पुनर्रचना करून पर्वतीय दल निर्माण करून त्यांना अत्याधुनिक हत्यारे व साधन सामुग्रीने तयार केले याशिवाय वायु सीमेचे आधुनिकीकरण करून दुर्लक्षित असलेल्या उत्तर सीमेकडे लक्ष केंद्रित केले. 1962 मध्ये यशवंतरावांनी संरक्षण मंत्री पद स्वीकारले तेव्हा नेहरूंना ते म्हणतात माझ्याजवळ केवळ देशभक्ती आहे याशिवाय दुसरे काही नाही मी फक्त संरक्षण यंत्रणा सज्ज करत आहे. हा त्यांच्या कारकीर्दीतील महत्वाचा अध्याय होता. 1965 मध्ये कच्छ प्रकरणावरून भारत-पाक युद्ध सुरू झाले यावेळी संरक्षण खात्याचा धोरणाशी निगडीत अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. या काळात यशवंतरावांची जवळीक प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांच्याशी होती त्यामुळे वेगवेगळी विचार विमर्श होऊं लागला 1965 मध्ये देशासाठी तयार झालेला धोका शास्त्रीजी जाणून होते. पण त्याचा मुकाबला करण्याची हिम्मत त्यांनी धरली होती हे यशवंतरावांना ठाऊक होते त्यामुळे यशवंतराव बिनधास्तपणे निर्णय घेत होते. एक संरक्षण मंत्री म्हणून त्यांना देशाच्या जिवनावर दूरगामी परिणाम करणारे कित्येक निर्णय त्यांना घ्यावे लागत होते. या काळात पंतप्रधानांची साथ असणे गरजेचे होते ती साथ यशवंतरावांनी शास्त्रीजींच्या माध्यमातून प्राप्त केली होती. याच काळात कश्मीरची स्थिती अतिशय नाजूक बनली होती शत्रुचे सैन्य पुढे सरकत होते अशावेळी विमानातून बॉम्ब हल्ला करण्याची परवानगी फक्त पाच ते दहा मिनिटात सेनापतीला हवी होती या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून शास्त्रीजींच्या परस्पर त्यांनी मंजुरी दिली. आणि नंतर यशवंतरावांनी स्वतःहून घेतलेल्या निर्णयाची माहिती शास्त्रीजींना सांगितली. तेव्हा शास्त्रीजी फक्त एवढेच म्हणाले ''अच्छा किया' एवढेच वाक्य शास्त्रीजींनी उद्गारले यावरून दोघातील विश्वासाची आपणास कल्पना येते हेच यशवंतरावांच्या कर्तव्याचे फलित होय.

**यशवंतरावांचे धोरण व पाकच्या पराभवानंतरच्या घडामोडी :-**

भारत पाक संघर्षाच्या काळात देशातील सर्व लहान-थोर वेगवेगळ्या शब्दांच्या माध्यमातून पाकिस्तान संदर्भात बोलत होते. पण शास्त्री आणि यशवंतराव हे दोन नेते मात्र अतिशय कमी बोलत होते. हे निर्धाराचे आणि कणखरपणा चे लक्षण होते भारत- पाक युद्धात पाकिस्तानचा पराभव होऊन विजयी झेंडा भारताने कब्जा केलेल्या भागात रोला आणि ठिकाणी विजयीउत्सव सुरू झाले शब्दाचे पूर वाहू लागले परंतु हे दोघे नेते मात्र घट्ट ओठाणे आपले कार्य करत राहिले होते. हा त्यांचा निग्रहीपणा व प्रसिद्धी परीन्मुखता फक्त कुशल आणि कर्तत्वान नेत्यांच्या ठिकाणीच असू शकते. एकंदर वरील प्रमाणे सामान्य कुटुंबात जन्म घेऊन संस्काराचा अभाव होता तरी पण संस्कारी विचार आत्मसात करून स्वकर्तुत्वाने राज्याच्या आणि देशाच्या राजकारणात आपल्या कार्याचा ठसा यशवंतरावांनी उमटविला होता. त्यांच्या वरील धोरण आणि निर्णय प्रक्रिया आपणास स्पष्ट होते

## संदर्भ सूची :-

[1]. यशवंतराव चव्हाण जीवन दर्शन, डॉ. पंजाबराव देशमुख.
[2]. ऋणानुबंध: यशवंतराव चव्हाण, सोहन प्रकाशन पुणे.
[3]. लोकोत्तर लोकनेता - एस.के. कुलकर्णी.
[4]. आधुनिक भारताचा इतिहास, डॉ. शांता कोठेकर 1947 ते 2000
[5]. पंडित नेहरू एक मागोवा : राजूरकर कुरुंदकर.
[6]. भारत की विदेश नीति, डॉ. रजबाला सिंह.